I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** वागले इस्टेट

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0028  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 14/02/2023 18:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): सोमवार  **Date From** (दिनांक पासून): 02/01/2023
   **Time Period** (कालावधी): पहर 6  **Date To** ( दिनांक पर्यंत): 02/01/2023
   **Time From** (वेळेपासून): 16:25 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 16:54 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 14/02/2023  **Time** (वेळ): 17:55 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 022

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 14/02/2023 17:55 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पूर्व, 2 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): कषी अधिकारी कार्यालय वागळे ईस्टेट ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मधुकर हरी पाटील

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** हरी पाटील

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1961

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | अंबाडी,ता भिवंडी, जि ठाणे,भिवंडी तालुका,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अंबाडी,ता भिवंडी, जि ठाणे,भिवंडी तालुका,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. विजय अरुण तुपसौंदर्य | | वडील का नाम : अरुण तुपसौंदर्य | 1. 101,ओमकार बिल्डींग,, हिरानंदानी ईस्टेट, पातलीपाडा, ठाणे ,कासारवडवली ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्यादी यांनी आज रोजी फिर्याद दिल्यानंतर

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10.**Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र**.,**जर असल्यास**)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (**प्रथम खबर हकीकत **):**

वा. इ. पो. स्टे. गुन्हा रजि नं. 28/2023 भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988(संशोधन2018) चे कलम7प्रमाणे दि. 14/02/2023
यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली की, यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. विजय अरुण तुपसौंदर्य, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय वागळे ईस्टेट ठाणे यांनी फिर्यादी यांचा ' सागर संकेत कृषीसेवा केंद्र ' या नावाने असलेल्या शेत खत विक्री केंद्राचा निलंबित केलेला परवाना पुन्हा सुरु करुन देणेकरीता फिर्यादी यांचेकडे 20,000/-रुपयांची ( विस हजार रुपये ) लाचेची मागणी केली म्हणून फिर्यादी यांची श्री. विजय अरुण तुपसौंदर्य, वय - 51, व्यवसाय- नोकरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय वागळे ईस्टेट ठाणे, रा.रु नं. 101, ओमकार बिल्डींग, हिरानंदानी ईस्टेट, पातलीपाडा, ठाणे पश्चिम, मुळ पत्ता - 504,/503, र्व्हेरा सहकारी गृहनिर्माण संस्था ता. माणगांव, जि. रायगड यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. अशा आशयाची फिर्याद दिल्याने तशी गुन्हा रजिस्टरी नोंद करुन FIR ची ,एक प्रत फिर्यादी यांना विनामुल्य देण्यात आली आहे.सदर गुन्ह्याची माहीती नियंत्रण कक्ष ठाणे येथे ईमेलद्वारे पाठविण्यात आले आहे.सदर FIR ची दुसरी प्रत मा.न्यायालयात पाठविण्याची तजविज ठेवली आहे.सदर गुन्ह्याची माहीती मा.वरिष्ठांना देवुन मा.वरिष्ठांच्या आदेशान्वये गुन्ह्याचा पुढील तपास-पोलीस उप अधिक्षक/ श्रीमती अश्विनी पाटील (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे ) हे करीत आहेत फिर्याद
दिनांक:- 14/02/2023.

मी, मधुकर हरी पाटील, वय - 62, व्यवसाय - शेत खत विक्री '' सागर संकेत कृषीसेवा केंद्र '' रा. अंबाडी, ता. भिवंडी, जि. ठाणे समक्ष वागळे ईस्टेट पोलीस स्टेशन येथे हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की,
मी वरील पत्त्यावर रहावयास असुन माझे घरी माझी पत्नी व तीन मुले, एक सुन असे आम्ही राहण्यास आहोत. '' माझ्या मालकीचे खत विक्रीचे '' सागर संकेत कृषीसेवा केंद्र '' अंबाडी नाका येथे असुन त्यामधुन मिळणा-या उत्पन्नातुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतो.
मी '' सागर संकेत कृषीसेवा केंद्र '' अंबाडी नाका येथे खत विक्रीचा व्यवसाय करत असुन सदर खत विक्री करीता मला परवाना अधीकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडुन परवाना नं. LAFD02040039 असा मिळालेला आहे. नमुद दिलेल्या परवान्यानुसार मी सागर संकेत कृषीसेवा केंद्र या नावाने खत विक्री दुकाण सुरु केले आहे.
त्यानुसार ठाणे जिल्हयातील शेतकरी यांना खताची विक्री करुन पुरवठा करत असतो. ठाणे जिल्हयामधुन पालघर जिल्हा सन 2014 मध्ये वेगळा केल्यानंतर आम्ही ठाणे व पालघर जिल्हयातील आमचे परीसरातील शेतकरी यांना खत विक्री करत होतो परंतु जिल्हा कृषी विभागाकडुन जिल्हयाबाहेरील शेतक-यांना खत विक्री केल्याचे उल्लंघन केले म्हणुन माझा खत विक्री परवाना दि. 12/12/2022 रोजी निलंबन केलेबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी कळविले आहे. त्यानुसार मी माझा खत विक्री व्यवसाय बंद केला.
त्यानंतर मी दि. 26/12/2022 रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयात माझे खत विक्रीबाबतचे निलंबीत केलेले लायसन्स सुरु करुन मला खतविक्री करणेबाबत परवानगी देणेकरीता पत्रव्यवहार केला. सदर वेळी श्री. तुपसौंदर्य, निरीक्षक कृषी अधिकारी कार्यालय ठाणे यांनी मला माझे खत विक्रीचे निलंबीत केलेले लायसन्स सुरु करणेकरीता व खत विक्री करणेस परवानगी देणेकरीता माझेकडे 25 हजार रुपयांची मागणी केली आहे परंतु मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची अजिबात इच्छा नाही. करिता माझी त्यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत कायदेशीर तक्रार आहे. त्याप्रमाणे त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. माझे व नमुद कृषी निरीक्षक तसेच त्यांचे कार्यालयातील इतर कोणाशी देवाण - घेवाणीचा कोणताही आर्थीक व्यवहार नसुन कोणताही वादविवाद नाही.'' वगैरे मजकुराची कायदेशीर तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे कार्यालयात दि. 02/01/2023 रोजी दिली

आहे.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने ठाणे अँन्टी करप्शन ब्युरोकडील पोलीस उप अधीक्षक श्रीमती अश्विनी पाटील यांनी दि. 02/01/2023 रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे उपस्थितीत पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणी दरम्यान मी व पंच श्री. गावंडा यांचे सोबत लोकसेवक श्री. तुपसौंदर्य, निरीक्षक यांची भेट घेण्याकारीता त्यांचे कार्यालय कृषी अधिकारी कार्यालय, वागळे ईस्टेट ठाणे येथे गेलो. सदर वेळी मी त्यांना मला तुम्ही ते पत्र पण दिल नाही साहेब असे विचारले असता लोकसेवक श्री. तुपसौंदर्य यांनी कस देणार ....असे सांगीतले. त्यावेळी मी माझे कामा संदर्भात काय झाले तुमचे काय ते सांगा तुम्ही बोला एकदा .... निर्णय लावुन टाका....मला ते हे देवुन टाका ना पत्र नुसत अर्धवट ठेवल....दिल पण नाय माझा पाय मोडलाय किती अडचण होते असे विचारले. त्यावेळी त्यांनी मला तुम्हाला मी काय सांगीतल... तुम्ही शांत रहा म्हटल मी असे त्यांनी मला सांगीतले. त्यावेळी मी लोकसेवक श्री तुपसौंदर्य यांना '' काय असेल ते सांगा मला .... देवुन टाकतो मी काय असेल ते ...उदया मला शेतकरी बोंब मारतील ...एकदा सुरुवात करु दया ....तुम्ही पंचवीस बोलले होते.'' त्यावेळी लोकसेवक तुपसौंदर्य यांनी हं ...हं...हं.. म्हणुन मला सांगीतले. त्यानंतर मी त्यांना किती पाहीजे तुम्हाला बोला असे विचारले असता, लोकसेवक श्री तुपसौंदर्य यांनी '' तुम्हाला सांगीतल ना ... पंचवीस करा म्हणुन '' असे मला सांगीतले. त्यावेळी मी त्यांना पंचवीसमध्ये काही कमी करा असे विचारले त्यावेळी त्यांनी मला '' पंचवीसमध्ये काय कमी करणार '' असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना तुम्हाला पहीले दहा दिले आता पंचवीस जास्त होतात... तुम्ही सांगा किती दायाचे असे विचारले असता त्यांनी मला वीस दया असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर त्यांनी मला चालु करा असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' चालु केलय हळु हळु.. '' असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी मला पत्र तयार केलय मी असे सांगुन मला निलंबन रद्द केलेबाबतचे पत्र दाखविले. सदर वेळी मी लोकसेवक श्री तुपसौंदर्य यांना सांगीतले की, '' दया पत्र मग आणुन देतो तुम्हाला मी....किती देवु पंचवीस ....'' असे विचारले असता त्यांनी मला हो ..पंचवीस करा ...हं. आणि चर्चा करत बसु नका कुठं ......सोमवारी आपल आपल काम चालु ठेवा.. असे मला सांगीतले त्यानंतर मी व पंच असे पडताळणी पथका जवळ निघुन आलो.

त्यानंतर वेळे अभावी त्याच दिवशी सापळापुर्व व सापळा कारवाई करण्याचे ठरविले असता मी माझेकडील असलेल्या रक्कमेपैकी 20,000/-रु. रोख रक्कम आपले समक्ष पंचाकडे सादर केली असता सापळापुर्व कारवाईचे कामकाज पुर्ण झालेनंतर अँन्थ्रासिन पावडर लावलेली नमुद लाचेची रक्कम माझे नेसुस पॅन्टचे खिश्यामध्ये ठेवुन दिल्यानंतर मी व पंच नं. 01 श्री. गावंडा असे लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो असता लोकसेवक श्री तुपसौंदर्य हे त्यांचे कार्यालयात उपस्थित नव्हते. त्यामुळे मी त्यांचे कार्यालयाचे बाहेर येवुन लोकसेवक श्री तुपसौंदर्य यांना माझे मोबाईल वरुन स्पिकर ऑन करुन फोन केला व मी ऑफीसमध्ये आलेबाबत सांगीतले. सदर वेळी लोकसेवक श्री तुपसौंदर्य यांनी फोन कट केला व काही वेळातच त्यांचे कारमधुन कार्यालयाचे आवारात आले. सदर वेळी मी त्यांना झाल का काम असे विचारले. त्यावेळी त्यांनी उदया असे सांगीतले. त्यानंतर आम्ही लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो. सदर वेळी मी लोकसेवक श्री. तुपसौंदर्य यांना '' साहेबांना पण दयायचे होते पाच ...त्या दिवशी दिले होते आणखी पाच दयायचे होते .... ते वीस आणले आता.....असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी काय ते बघतो मी.. असे मला सांगीतले. त्यानंतर लोकसेवक श्री तुपसौंदर्य यांना त्यांचे मोबाईलवर कोणाचातरी फोन आला व ते फोनवर बोलत कार्यालयाचे बाहेर गेले व काही वेळाने पुन्हा ते आतमध्ये आले. त्यावेळी मी त्यांना '' तुम्ही पंचवीस सांगीतले होते मी वीस आणले ...मोजुन घ्या ना सर दया ते पत्र ....केलय का...'' असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला '' गडबड करु नका थांबा जरा '' असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी मला त्यांचेकडे असलेले माझे लायसन्सचे निलंबन रद्द केलेबाबतचे पत्र दिले. त्यावेळी मी त्यांना साहेबांची आज सही घेतली का त्याच दिवशी असे मी त्यांना विचारले. त्यावर त्यांनी मला '' तारीख दिसत नाही का... तारीख पहा कधीची आहे ती .... असे मला सांगीतले. त्यांनतर त्यांनी मला '' काही तरी प्रॉब्लेम झालाय .... तिकडे येईल तेव्हा दया ....'' असे मला सांगीतले. तेव्हा मी त्यांना आता घ्या ना असे विचारले असता त्यांनी मला नाय तिकडे आल्यावर फोन करतो मी असे मला सांगीतले. त्यानंतर मी पुन्हा त्यांना आता घ्या असे विचारेल असता, त्यांनी मला '' तिकडे आल्यावर फोन करतो मी ....तिथे आल्यावर ते बोलतो ना ..... मागच्या वेळेस मी तुम्हाला हे केल ना ...मग या बघु ना तुम्हाला कॉल करतो...असे सांगीतले. त्यानंतर मी लोकसेवक यांना म कधी याल असे विचारले असता त्यांनी मला '' हां चला येतो मग मी...'' असे सांगुन सदर ठिकाणावरुन निघत होतो त्यावळी लोकसेवक यानी हं.....तिकडे आलो ना... असे बोलुन इशारा करुन पैशाची मागणी केली. त्यानंतर मी लोकसेवक यांनी पैसे स्विकारले नाही म्हणुन कोणताही इशारा न करता, मी व पंच श्री. गावंडा असे लोकसेवक यांचे कार्यालयातुन निघुन परत शासकीय वाहना जवळ परत आलो. त्यानंतर सापळापुर्व व सापळा परतीचा पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि. 08/02/2023 रोजी सापळा कारवाई आजमाविण्यात आली असता, सदर कारवाई दरम्यान लोकसेवक हे त्यांचे कार्यालयात उपस्थित नसल्याने मी माझे मोबाईलवरुन त्यांना फोन केला असता, सदर वेळी लोकसेवक श्री तुपसौंदर्य यांनी मला मी जेवायला बाहेर आलोय असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' वाट बघतो .....तुम्ही मला सांगितल होत ना......भेटायला या.....'' तेव्हा त्यांनी मला '' मला दहा पंधरा मिनीट लागतील.....'' असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' चालेल थोडा वेळ थांबतो ना मी.........या...या......'' असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला वेळ लागेल.........तुम्ही काम करा.....तुम्ही जा..... मी तिकडे आलो की भेटेन असे सांगीतले व फोन कट केला त्यानंतर मी व पंच असे कोणताही इशारा न करता लोकसेवक यांचे कार्यालयातुन निघुन शासकीय वाहना जवळ परत आलो.

त्यानंतर काही वेळाने मी दोन्ही पंचा समक्ष लोकसेवक श्री. तुपसौंदर्य यांना माझे मोबाईलवरुन स्पीकर ऑन करुन फोन केला. सदर वेळी लोकसेवक श्री. तुपसौंदर्य यांनी मला '' पाटील साहेब मला वेळ होईल......ऐकून घ्या.....मी आलो आहे इकडे.........पोलीस स्टेशनला... हा... सी. पी. ऑफिसला.........त्यांचे साहेबांनकडे काम आहे...... मला काय उशीर होईल......नंतर केव्हा आलो तर फुरसत मध्ये बोलतो......'' असे सांगीतले असता मी त्यांना '' उशीर होईल म्हणजे........ किती वाजतील........साहेब '' असे विचारले असता, लोकसेवक यांनी '' किती होईल सांगता येत नाही......दुसरीकडे एका ठिकाणी जायचय......त्यांच काम आहे एक...'' त्यावेळी मी त्यांना सोमवारी येवु का असे विचारले. त्यावेळी त्यांनी '' मी काय सांगतो तुम्हाला.......... मी तिकडं आलो की.....बोलतो तुम्हाला.........तुम्हाला मी बोलवल का इकडं.....आं.....'' असे विचारले. त्यावेळी मी त्यांना '' ते काय झाल होत.........तुम्ही मला सांगितल होत......येवून जा.....'' असे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक यांनी '' ऐकून घ्या मी तिकडे आलो की.....तुम्हाला भेटतो म्हणून..... बोललो.......होतो.....तिकडं आलो की भेटतो '' असे सांगुन फोन कट केला. त्यानुसार नमुद सापळापुर्व व सापळा परतीचे पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि. 13/02/2023 रोजी सापळा पुर्व व सापळा कारवाई अजमाविण्यात आली असता, सदर वेळी मी लोकसेवक श्री. तुपसौंदर्य यांची त्यांचे कार्यालयात जावुन भेट घेतली. सदर वेळी त्यांनी मला 'काय म्हणताय ' असे विचारले असता मी त्यांना '' आलोय भेटायला '' असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी मला पाच मिनीट थांबण्यास सांगीतले. त्यानंतर मी त्यांना '' ऑन लाईन करत नाही तुम्ही लोक'' असे विचारले असता, त्यांनी मला '' केलाय '' असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी मला बसण्यास सांगीतले व '' आमचा तुमच्यावर राग नाही '' असे सांगीतले. त्यावेळी मी ही त्यांना '' माझा तुमचावर राग नाही'' असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी त्यांचे संगणकावर चेक करुन '' येवढ ऑनलाईन पडल बघा सर्व केलय बघा '' असे मला सांगीतले. त्यानंतर मी त्यांना '' तुमचे काम केलय ते फक्त सांगा'' असे विचारले असता, त्यांनी मला '' तिकड.....तिकड.....इकड नाही तिकड आल्यावर हं तिकड आल्यावर बोलतो मी '' असे मला सांगीतले. त्यानंतर मी त्याना '' इकडे घ्या ना आणलेत मी आता'' असे विचारले असता त्यांनी मला '' एकदा तुम्हाला बोलले ना चर्चा नाका करु...तिकड आल्यावर भेटतो तुम्हाला'' असे सांगीतले. त्यानंतर मी पुन्हा त्यांना '' घ्या ना आणलेत मी तुमचे पैसे '' असे विचारले त्यावेळी त्यांनी मला '' आपण एकदा सांगितल ना परत परत गडबड करु नका ....तुम्हाला एकदा सांगीतल की गप ऐकायच.. '' असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना '' कधी येता तीकडे '' असे विचारले त्यावेळी लोकसेवक यांनी मला '' जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मी तीकडे येईन ..... तुम्हाला बोलेन तुमच्या जवळ बसेन काय इशु नाय ....'' असे सांगीतले.'' त्यानंतर मी व पंच असे कोणताही इशारा न करता लोकसेवक यांचे कार्यालयातुन निघुन शासकीय वाहना जवळ परत आलो. सदर वेळी सापळापुर्व व सापळा परतीचा पंचनामा करण्यात आला आहे.

एकंदरीत लोकसेवक श्री विजय अरुण तुपसौंदर्य, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय वागळे ईस्टेट ठाणे यांनी माझे '' सागर संकेत कृषीसेवा केंद्र'' या नावाने असलेल्या खत विक्री केंद्राचा निलंबित केलेला परवाना पुन्हा सुरु करुन देणेकरीता माझेकडे 25,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 20,000/-रु लाचेच्या रक्कमेची मागणी केलेबाबत निष्पन्न झाले आहे.

अशाप्रकारे यातील लोकसेवक श्री. विजय अरुण तुपसौंदर्य, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय वागळे ईस्टेट ठाणे यांनी माझ्या ' सागर संकेत कृषीसेवा केंद्र ' या नावाने असलेल्या शेत खत विक्री केंद्राचा निलंबित केलेला परवाना पुन्हा सुरु करुन देणेकरीता माझेकडे 20,000/-रुपयांची ( विस हजार रुपये ) लाचेची मागणी केली म्हणुन माझी श्री. विजय अरुण तुपसौंदर्य, वय - 51, व्यवसाय- नोकरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय वागळे ईस्टेट ठाणे, रा.रु नं. 101, ओमकार बिल्डींग, हिरानंदानी ईस्टेट, पातलीपाडा, ठाणे पश्चिम, मुळ पत्ता - 504,/503, रव्हेरा सहकारी गृहनिर्माण संस्था ता. माणगाव, जि. रायगड यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केली असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व

वरिष्ठ पोलीस निरिक्षक वागळे इस्टेट ठाणे

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

बरो आहे.
समक्ष

हि दिली फिर्याद

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधिक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

JITENDRA RAMNARAYAN RATHOD(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank** (पद): **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
वागळे इस्टेट पोलीस स्टेशन
ठाणे शहर.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)